# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेसनोट 27/06/2020

## देहूरोड पोलीस स्टेशन गु.र. क्र.४९८/२०२० मधील आरोपीस अटक करून एकूण २,५०,०००/- रुपये चा किंमतीचा माल हस्तगत केला

प्रेस नोट दिनांक २७/०६/२०२०

मागील काही दिवसांपासुन पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत इंडस्ट्रियल एरीयामध्ये होणा-या चो-यांच्या अनुषंगाने मा. पोलीस आयुक्त, श्री संदीप बिष्णोई सो, यांच्या सुचनांप्रमाणे देहुरोड पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मनिष कल्याणकर, यांनी तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना सदरच्या चोरट्यांचा शोध घेण्याच्या सुचना दिल्या होत्या. दिलेल्या सुचनांप्रमाणे देहुरोड पोलीस ठाणेच्या तपास पथकातील कर्मचारी **पोशि संकेत घारे** यांना गुप्त बातमीदारांमार्फत माहिती मिळाली की, कुदळवाडी चिखली येथील काही इसम तळवडे या भागात येवुन इंडस्ट्रीयल एरीयामध्ये कॉपर वायर व अन्य स्टीलच्या साहित्यांची चोरी करीत असतात.

त्यावरुन सदर गुन्ह्याचे तपासादरम्यान पोलीस शिपाई संकेत घारे यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, झेन कार क. एम.एच. ०२/के.ए. ०३४४ यामध्ये तांब्याची केबल चोरी करुन तळवडे चौक येथे येणार आहेत. सदर बातमीच्या अनुशंगाने मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मनिष कल्याणकर, यांनी दिलेल्या निर्देशानुसार दिनांक २७/०६/२०२० रोजी पहाटे ०१/०० वा. ते ०८/०० वा. पावेतो पोलीस उपनिरीक्षक श्री अशोक जगताप, पोशि संकेत घारे, पोशि सुमित मोरे यांनी सापळा लावुन तळवडे चौकात संशयीत मारुती सुझुकी झेन कार कमांक एम.एच.०२/के.ए./०३४४ ही पकडली असता त्यामध्ये असणारे इसमांकडे चौकशी केली असता त्यांनी त्यांची नावे (०१) रफिक अब्दुल्ला अन्सारी वय ४० वर्षे, रा. रविरंजन वजन काट्याजवळ, रोकडे यांची चाळ, खोली क.०६ कुदळवाडी, ता. हवेली जि. पुणे. मुळगाव :- मु.पो. सलनजोत, तहसिल इटवा, जि. सिध्दार्थनगर, उत्तरप्रदेश (०२) मोहम्मद छोटु मोहम्मद इसिम अन्सारी, वय ३५ वर्षे, रा. सदर. (०३) मोहम्मद मोकीम वाजीद अली शाह, वय ३५ वर्षे, रा. आकाशनगर, कुदळवाडी, चिखली, पुणे, मुळगाव :- मु.पो. परसा, तहसिल इटवा, जि. सिध्दार्थनगर, उत्तरप्रदेश असे असल्याचे सांगितले. सदर आरोपीतांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी चोरी केलेला अंदाजे २०० किलो कॉपर वायर इसम नामे (०४) अब्दुल रहीम खान, वय २४ वर्षे, रा. सुपर काट्याजवळ, रहीमानी फाटा, कुदळवाडी, चिखली, पुणे यांना दिल्याचे सांगितल्याने सदरचा कॉपर वायर किंमत अंदाजे १,००,०००/- रुपये तसेच झेन कार किंमत १,५०,०००/- असा एकुण २,५०,०००/- चा माल ताब्यात घेतला असुन देहुरोड पोलीस ठाणे, गुन्हा रजि.कमांक ४९८/२०२० भा.दं.वि. कलम ३७९, ४६१ प्रमाणेचा एक गुन्हा उघडकीस आला असुन अधिक तपास सुरु आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री अशोक जगताप करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्ता सो, श्री संदीप बिष्णोई, मा. अपर पोलीस आयुक्त सो, श्री रामनाथ पोकळे, मा. पोलीस उप-आयुक्त सो परिमंडळ-२, श्री विनायक ढाकणे सो, मा.सहा.पोलीस आयुक्त सो, देहुरोड विभाग श्री संजय नाईक पाटील सो, मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मनिष कल्याणकर, मा.पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री गोफणे यांचे मार्गदर्शनाखाली देहुरोड पोलीस ठाणेचे तपास पथकाचे सपोनि प्रसाद गज्जेवार, पोउपनि अशोक जगताप, पोशि सुमित मोरे, पोशि संकेत घारे, पोशि सचिन शेजाळ, पोशि विजय गेंगजे यांनी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
देहुरोड पोलीस ठाणे

